"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal of Multidisciplinary Research
Volume: 09, Issue: 01, Jan. – Feb. 2022 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 6.02

# लोकशाही विकासामध्ये नागरी समाजाची भूमिका

**डॉ. योगेश भादे**
सहायक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात लोकशाहीमध्ये नागरी समाजाची भूमिका अनेक पटीने वाढलेली आहे. लोकशाहीमधील त्रुटींना दूर सारून प्रभावीपणे राबविण्यात नागरी समाजाचे योगदान अनन्यसाधारण आहे. एखाद्या देशाला एकसंध लोकशाही असण्यासाठी, त्यात जिवंत, मुक्त, सक्रिय आणि उच्च दर्जाचा नागरी समाज असणे आवश्यक मानले जाते.जगभरातील विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये लोकशाही प्रस्थापित करणे आणि तिचा सर्व स्तरांमध्ये विस्तार करणे याकामी सक्रिय नागरी समाजाची भूमिका निर्णायक असते. आफ्रिकेतील देशांमध्ये याची प्रचिती दिसून येते. वसाहतवादाच्या पश्चात उदयाला आलेल्या तिसऱ्या जगातील लोकशाहीकरण प्रक्रियेत नागरी समाजाच्या महत्त्वाला अधोरेखित करणाऱ्या अनेक सिद्धांतांची मांडणी करण्यात आली. हे सिद्धांत 1980 च्या दशकात अधिकाधिक लागू झाले.प्रथम पूर्व युरोपीय संदर्भात आणि नंतर तिसऱ्या जगाच्या अभ्यासात "नागरी समुदाय" या संकल्पनेचावापर करण्यात आला. जागतिक बँकेने नागरी समाजाच्या सिद्धांताने प्रभावित होऊन "गुड गव्हर्नन्स" या संकल्पनेद्वारे आपला नव-उदारमतवाद संस्थावाद अधिक जटिल आर्थिक आणि सामाजिक सिद्धांतामध्ये परिवर्तीत केला आहे. यावरून आधुनिक

काळातील लोकशाही व्यवस्थेमधील नागरी समुदायाची भूमिका ठळकपणे जाणवते.

लोकशाही ही आधुनिक जगातील सर्वात मौल्यवान आणि बहुमुखीअशी राजकीय संकल्पना आहे. लोकशाहीला इंग्रजीमध्ये "डेमोक्रसी" असे म्हटले जाते. "डेमोक्रसी" हा शब्द मूळतः दोन ग्रीक शब्द 'डेमोस' म्हणजे लोक आणि 'क्राटोस' म्हणजे नियम यावरून तयार झाला आहे.त्याचा मूळ अर्थ असा होतो कि, "असे सरकार जिथे सत्ता ही लोकांमध्ये निहित असते."ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकापासून आजपर्यंत लोक "लोकशाही" हा शब्द याच अर्थाने वापरत होते. इंग्लंडमध्ये अकराव्या शतकात जेव्हा निरंकुश शासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले तेंव्हा लोकशाहीबाबतची संकल्पना विकसित होऊ लागली.अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धानंतर स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या घोषणा आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या क्रांतिकारकांनी सामाजिक कराराद्वारे त्याची बाजू मांडणाऱ्या जॉन लॉक आणि रुसो यांच्या लेखनात लोकशाहीचा संदर्भ आढळतो.यासह जे.एस.मिल, टी.एच.ग्रीन, हॅरोल्डलास्की, मॅकआयव्हर, जॉन ड्यूईयासारख्या अभ्यासकांनी लोकशाहीवादी विचारांना प्रोत्साहन दिले. सर्वहारा क्रांतीच्या अनुषंगाने कल्याणकारी राज्य मॉडेल सादर करतांना लोकशाही हे लोकांसाठीचे सरकार असले पाहिजे या कल्पनेची पोकळी बऱ्याच प्रमाणात भरून निघाली आहे.अब्राहम लिंकनच्या मते, " लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांसाठीचे सरकार आहे."सीलेनेपरिभाषित केल्याप्रमाणे "ते सरकारचे स्वरूप आहे ज्यामध्ये प्रत्येकाचा वाटा असतो." लोकशाही व्यापक दृष्टीने पाहता एक आदर्श विचारप्रणाली आहे. लोकशाही समाजामध्ये समता आणि बंधुत्वाची भावना प्रबळ असते. लोकशाहीमध्ये आत्मनिर्णयसह कोणत्याही बाह्य अधिकाराच्या नियंत्रणापासून स्वतंत्रता देखील सूचित होते. त्यासाठी लोकशाही स्वभाव, निवास स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची भावना आवश्यक आहे. न्याय आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची ही सर्वात विश्वासार्ह व्यवस्था आहे. लोकशाही ही स्वतः साधन

आणि साध्य दोन्ही आहे. याच कारणामुळे आधुनिक काळात राजकीय व्यवस्थेचा सर्वात एक आदर्श प्रकार म्हणून लोकशाहीस ओळखले जाते. ज्या समाजामध्ये लोकशाही व्यवस्था मजबूत आहे तो समाज आपल्या उद्दिष्टांची पूर्तता जलदगतीने करू शकतो. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातून साम्राज्यवादाची माघार झाली आणि लोकशाही व्यवस्था प्रबळ होत गेली. विकसित, विकसनशील आणि अविकसित अशा सर्वच देशांमध्ये आज एक लोकप्रिय व्यवस्था म्हणून लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसून येतो. मात्र लोकशाहीच्या यश-अपयशाचा अनुभव मात्र सर्वत्र समान नाही. ज्याप्रमाणात विकसित देशांमध्ये लोकशाहीची मुळे घट्ट दिसून येतात त्याप्रमाणात विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये हीच लोकशाही अडखळत प्रवास करतांना आढळून येते. लोकशाहीच्या दर्जावरून जगाचे विकसित देश आणि इतर देश असे स्पष्ट विभाजन दिसून येते. जगातील सर्वच देशांमध्ये लोकशाहीला प्रभावित करणाऱ्या समस्या कमी अधिक प्रमाणात सारख्याच आहेत. एक फरक याठिकाणी आढळतो आणि तो म्हणजे या समस्यांवर मात करून लोकशाहीला भक्कम करणारे सहायक घटक जे विकसित देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर सक्रीय असतात आणि इतर देशांमध्ये त्यांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असते. आधुनिक काळात नागरी समाज हा अशाच प्रकारे सहायक घटकामध्ये गणला जातो. ज्या देशामध्ये एक सक्रीय आणि जिवंत नागरी समाज आहे त्या देशांमध्ये लोकशाहीपुढे कितीही आव्हाने असले तरी ती आव्हाने लोकशाही व्यवस्थेस विचलित करू शकत नाही. नागरी समाज हा स्वयंप्रेरित घटक असतो जो देशांतर्गत आणि देशाबाहेरील पर्यावरणात सातत्याने आपली भूमिका निभावत असतो. जगभरात विकसनशील देशांमध्ये नागरी समाजावर मोठी जबाबदारी येते.

**नागरी समाज**

आज जागतिक स्तरावर नागरी समाजाच्या उदयाने एका नवीन युगाची सुरुवात केली आहे. जगात आधुनिक युगाचा उदय होण्यापूर्वी हा

सरंजामशाही, कुलीन आणि निरंकुश नियमांविरुद्ध बहुसंख्यांकाचा संघटित आवाज होता. आधुनिक काळात नागरी समाज हे विविध गटांसाठी एक समान व्यासपीठ बनले आहे जे सामान्य हिताच्या अनुभूतीसाठी अप्रतिसादित राज्याविरुद्ध त्यांचा खरा आवाज नियंत्रित करतात. निवड, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि वैयक्तिक जबाबदारीचे क्षेत्र म्हणून नागरी समाजाची एक विशेष ओळख आहे.

नीरा चंडोकयांच्या मते, "नागरी समाज ही मूलतः एक संकल्पना आहे जी व्यक्तिवाद आणि मानवी हक्कांचे संरक्षण यावर स्थापित राजकीय आधुनिकतेच्या परंपरेशी संबंधित आहे. जॉन लॉक यांनी व्यक्तींच्या हक्कांचे समर्थन करणारे राज्य सूचित करण्यासाठी 'नागरी समाज' हा शब्द वापरला होता. हेगेलच्या मते, नागरी समाज हे "सार्वत्रिक अहंकार" चे क्षेत्र आहे, ज्यामध्ये व्यक्ती इतरांच्या हितांपेक्षा स्वतःच्याहिताला प्राधान्य देतात. दिपंकरगुप्तायांच्या मते, नागरी समाज ही केवळ एक बाब नाही परंतु परिस्थितीचा एक संच आहे ज्यामध्ये व्यक्ती राज्याशी एकत्रितपणे संवाद साधतात. रजनी कोठारी नागरी समाजाकडे सामान्य माणसाला सशक्त करण्याचा मार्ग आणि मानवी शासनाचा 'टेक ऑफ पॉइंट' म्हणून पाहतात. मानवाधिकार चळवळी, पर्यावरणीय चळवळी, महिला चळवळ यासारख्या विविध समकालीन सामाजिक चळवळींचा त्यात समावेश आहे. नागरी समाज व्यक्तींच्या हक्कांच्या सुरक्षिततेसाठी अस्तित्वात आहे आणि त्यामध्ये सार्वभौमिक कृतीद्वारे अशा परिस्थिती निर्माण केल्या पाहिजेत ज्याद्वारे व्यक्ती त्यांच्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा पूर्णपणे आनंद घेऊ शकतील. गुरप्रीत महाजन यांच्या मते,सिव्हिल सोसायटी एक सामूहिक संस्था आहे जी वैयक्तिक अधिकारांचे पालन करते आणि कायदेशीररित्या तिच्या सदस्यांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करते, ते लोकशाही राज्याच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या स्थितीचे प्रतीक आहे.

**लोकशाही पुढील आव्हाने**

यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे लोकशाही ही एक आदर्श राजकीय व्यवस्था आहे. आधुनिक काळात प्रत्येक देशामध्ये लोकशाहीसाठी एक प्रबळ जनमागणी दिसून येते. विकसनशील तसेच अविकसित देशांमध्ये देखील लोकशाही एक पर्याय तथा विकासाची पूर्व अट म्हणून गणली जाते. मात्र लोकशाही यशस्वी होण्यासाठी अनेक बाबी अनुकूल असणे तितकेच गरजेचे आहे. आधुनिक काळात खासकरून विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये लोकशाहीपुढे अनेक आव्हाने दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने शासन आणि प्रशासनातील भ्रष्टाचार, अकार्यक्षम पदाधिकारी, लोकांमधील राजकीय उदासीनता, राजकीय सामाजिकरण आणि सहभागाचा अभाव, शासन आणि शासित यांच्यामधील सुसंवादाचा अभाव यासारख्या समस्यांचा समावेश होतो. आशिया आणि आफ्रिका मधील देशांमध्ये या समस्या विशेषकरून आढळून येतात. या समस्या लोकशाहीच्या विकासात बाधा आणतात. यामुळे खऱ्या लोकशाहीची ध्येय तथा उद्दिष्ट साध्य होत नाही. मुळात लोकशाहीचे यश-अपयश हे त्या त्या राज्यातील लोकांच्या सहभागावर अवलंबून असते. ज्या देशांमध्ये लोकांचा राजकीय सहभाग हा खूप कमी असतो, जिथे लोक हे राजकीय प्रक्रियेपासून दूर असतात, जिथे लोकांना त्यांच्या हक्काची जाणीव नसते तसेच जिथे लोक हे कमी प्रमाणात संघटित असतात अशा व्यवस्थेमधील लोकशाहीमध्ये अनेक दोष निर्माण होतात. तिथे लोकशाही ही केवळ नावाला असते. जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये या समस्या कमी-अधिक प्रमाणात आढळून येतात. मात्र जिथे सशक्त, जागृत नागरी समाज असतो तिथे या समस्या फार काळ राहत नाही. विकसित देशांमधील परिस्थितीवरून ही बाब अनुभवता येते. नागरी समुदाय हा लोकशाहीला सशक्त करण्यात आणि कायम ठेवण्यात महत्वाचे योगदान देतो. या नागरी समुदायाचे योगदान पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**लोकशाहीमधील नागरी समाजाचे योगदान**

लोकशाहीच्या उभारणीत आणि टिकवण्यामध्ये नागरी समाज महत्त्वाची भूमिका बजावतो. नागरी समाजाच्या कृतीतून सरकारी धोरणांवर तसेच सामाजिक वृत्तीवर लक्षणीय प्रभाव पडत असतो. साधारणतः लोकशाहीमध्ये नागरी समाज पुढीलप्रमाणे योगदान देतांना दिसतो:

- **नागरिकांचा राजकीय सहभाग वाढविणे:** नागरी समाज नागरिकांना त्यांचे हक्क आणि कर्तव्ये याबाबत सजग करतात. त्यांच्या हक्काबाबत जागरूकता निर्माण करतात. यासह समाजातील दुर्बल घटक ज्यामध्ये वृद्ध, स्त्रिया आणि बालके, दलित आणि अल्पसंख्याक यांसारख्या घटकांना त्यांच्या हक्कांसाठी प्रेरित करून आणि सत्तेचा समान लाभ प्राप्त करून देण्यासाठी लढतांना देखील दिसतात. देशात महिलांसाठी सेवा, स्नेहालय, मकाम, आझादफाऊंडेशन यासारख्या संघटना कार्यरत आहेत. याबरोबरच क्विल फाउंडेशन ही भारतीय नागरी समाज संस्था (CSO) आहे जी संशोधन आणि वकिलीक्षेत्रात कार्यरत आहे. त्याचे कार्य वंचित लोकांना, विशेषतः आदिवासी, दलित, मुस्लिम, महिला, अल्पसंख्याक आणि शारीरिक अपंग व्यक्तींना भेडसावणाऱ्या मानवी हक्कांशी संबंधित आहे.
- **राज्य शक्ती नियंत्रित ठेवणे:** नागरी समाज राजकीय गैरवर्तन आणि कायद्याचे उल्लंघन तपासते. राजकीय शक्तीचा दुरुपयोग झाल्यास एक सशक्त नागरी समाज राज्याला जबाबदार धरण्यास सक्षम असतो. विविध माध्यमांतून नागरी समाज नागरिकांना संघटित करून सरकारला जाब विचारू शकतो. विकसित देशांमध्ये जिथे नागरी समाज जागृत आणि सक्रिय असतो अशा देशांमध्ये सत्ताधारक वर्ग विरोधी पक्षांप्रमाणे नागरी समाजाची दखल आय घेतांना दिसून येतो. सर्वसाधारण जनता जूलमी धोरणांचा विरोध करू शकत नाही अशा वेळी नागरी समाज हा पुढाकार घेतो.

- **राजकीय संघर्ष कमी करणे:** आधुनिक काळात विविधता असलेल्या देशांमध्ये व्यापक भिन्न-भिन्न हितसंबंधीगटांमध्ये संघर्ष उद्‌भवणे शक्य असते. विविध घटकांमध्ये सुसंवादसाधने आणि सर्वांना समान न्याय देणे हे आधुनिक राज्यांपुढे एक मोठे आव्हान असते. अशा वेळी एक सुस्थापित नागरी समाज समाजातील परस्पर विरोधी गटांना शांत करण्याबरोबरच सामाजिक आणि राजकीय स्थिरताराखतांनाराज्यास पूरक असे योगदान देतो. राज्यातील असामाजिक तत्वांवर नियंत्रण ठेवणे, नागरिकांना अशा गटांपासून दूर ठेवणे आणि सर्वोत्तम हितसंबंधांकडे लक्ष दिले जाईल या अनुषंगाने राज्यास स्वयं प्रेरणेने पूरक असे योगदानदेतो.

- **लोकशाही गुणधर्मांना चालना देणे:** मुळात नागरी समाजाची वैधानिक प्रक्रियेवर निष्ठा असते. नागरी समाजाच्या विकासामध्ये आणि वाटचाली मध्ये लोकशाही व्यवस्था महत्वाची भूमिका निभावते. आणि हाच नागरी समाज लोकशाहीच्या तत्वांना सर्वोपरी प्राधान्य देतांना दिसतो. नागरी समाज हा समाजातील जागृत आणि बुद्‌धिजीवी नागरिकांनी मिळून बनलेला आसतो. हा समाज आपल्या नागरिकांमध्ये सहिष्णुता, तडजोड करण्याची इच्छा आणि परस्परविरोधी विचारांचा आदर यासारख्या लोकशाही गुणांना प्रोत्साहन देतो.

- **राजकीय आणि आर्थिक सुधारणांना पाठिंबा देणे:** आधुनिक लोकशाही देशांमध्ये जनतेच्या पाठिंब्याशिवाय राजकीय आणि आर्थिक सुधारणा यशस्वी होऊ शकत नाहीत. याची जाणीव अनेक विकसित देशांमधील शासकांना असते. त्यामुळेच ते विविध योजना किंवा कार्यक्रमांची अंमलबजावणी करीत असतांनाराज्यातील सक्रिय नागरी समाजांची मदत घेत असतात. नागरी समाज हा जनमताला संघटित करण्याबरोबरच राज्यास पूरक आणि सहायकभूमिका पार पाडतो आणि सुधारणांचा मार्ग प्रशस्त करून देऊ शकतो. राजकीय पक्ष आणि इतर संघटनांना त्यांच्या हिताचे

प्रतिनिधित्व करीत असतांनाया समाजाची मदत होते. त्यामुळे लोकशाहीचा दर्जा सुधारतो.

- **नवीन राजकीय नेत्यांना प्रशिक्षित करणे:** जर राज्य समाजाच्या हिताचे पुरेसेप्रतिनिधित्व करण्यात अयशस्वी ठरले आणि त्यांचे हितसंकुचित केले तरनागरी समाज नवीन राजकीय नेत्यांना ओळखून त्यांचे सरकार पुनरुज्जीवित करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यास मदत करतो.समाजाच्या विकासासाठी दूरदृष्टी असलेल्या योग्य आणि लायक अशा नेतृत्वाला पाठिंबा देण्याबरोबरच सत्तेमध्ये अशा नेत्यांना कसे आणता येईल या दिशेने या समाजाची भूमिका निर्णायक असते.
- **निवडणूक निरीक्षण:** लोकशाहीमध्ये निवडणुका ह्या अत्यंत महत्वपूर्ण असतात. निर्वाचन प्रणाली ही निष्पक्ष आणि तटस्थ असेल तरच लोकांचा लोकशाहीमधील विश्वास कायम राहील. निवडणुकांमध्ये जर गैर प्रकार हॉट असतील तर ते लोकशाहीच्या हितासाठी घातक ठरू शकते. भारतात सार्वत्रिक किंवा राज्य निवडणुकांच्या वेळी पक्षनिरपेक्ष स्वयंसेवक संस्थांनिर्वाचन प्रक्रियेवर लक्ष्य ठेवून असतात. कोणत्याही मार्गाने गैरप्रकार घडणार नाही याबाबत ते सजग असतात. हा एक जागृत समाज असतो.

थोडक्यात सांगायचे झाल्यास लोकशाही समाजात नागरी समुदायाची भूमिका अनेक अर्थाने निर्णायक ठरते .टॉकविले यांच्या मते ,लोकशाहीला हुकूमशाही बनण्यापासून रोखण्यासाठी, व्यक्तींनी स्वतंत्रपणे तयार केलेल्या संघटना आवश्यक आहेत आणि या संस्था म्हणजेच नागरी समाज आहेत.नागरी समाज राज्याच्या कामकाजासाठी एक प्रकारेपोलिस म्हणून काम करतो आणि सत्तेच्या कोणत्याही गैरवापराबद्दल जागरुकता आणि चिंता वाढवून राज्याची शक्ती मर्यादित करून लोकांच्या इच्छेसाठी आणि भल्यासाठी मदत करू शकते. कायद्यांद्वारे माहिती मिळवण्यासाठी विनंती करणे आणि कायदे आणि संस्थांच्या मदतीने अधिकाऱ्यांचे भ्रष्ट वर्तन

लक्षात आणणे यासह सरकारच्या गैर-लोकशाही धोरणांविरुद्ध भारतामध्ये अनेक जनहित याचिका नागरी संस्थांनी दाखल केल्या आहेत.

नागरी संस्था लोकांमध्ये त्यांचे हक्क, कर्तव्ये, मतदानाचे महत्त्व याबद्दल जागरूकता वाढवून आणि त्यांना सहिष्णुता, विरोधी पक्षांचा आदर आणि अशा इतर लोकशाही मूल्यांबद्दल शिक्षित करून राजकीय सहभागाला प्रोत्साहन देतात. नागरी समाज पूर्व-अस्तित्वात असलेल्या सांस्कृतिक, सामाजिक, धर्मशास्त्रीय आणि इतर अनेक प्रकारच्या ओळखीच्या पलीकडे सहकार्याच्या नवीन पद्धती आणि उद्देशाने लोकशाही सुधारू शकतो. लोकशाहीतील संघर्ष सोडवण्यासाठी नागरी समाजही महत्त्वाची भूमिका बजावतात कारण त्यांच्या हितसंबंधांमध्ये विविधता असते.ते फायदेशीर आणि कायदेशीर असल्याशिवाय कोणतेही लोकशाही राज्य स्थिर मानले जाऊ शकत नाही. नागरी समाज हे राज्य तपासण्यासाठी पडद्यासारखे काम करते आणि लोकशाही राज्य आणि तेथील नागरिक यांच्यातविश्वासार्ह संबंध विकसित करण्यासाठी देखील महत्त्वाचे असते. नागरी संस्था विकासात्मक क्रियाकलाप तपासण्यासाठी समाजातील इतरसंस्थांसोबत काम करून काळानुसार घडून येणाऱ्या अनुकूलबदलांना ओळखण्यासाठी आणि त्यात सहभागी होण्याचे साधन प्रदान करतात. घर, बाजार किंवा राजकीय संस्थांच्या पलीकडे सामाजिक बदल घडवून आणणारे क्षेत्र म्हणजे नागरी समाज. हे असे क्षेत्र आहे जिथे व्यक्ती एक जबाबदार नागरिकाची भूमिका स्वीकारतो .येथे सामाजिक मदतीद्वारे संपूर्ण समाजाच्या अधिक चांगल्यासाठी ध्येय निर्धारित केली जातात. नागरी समाजांनी, अलीकडच्या इतिहासात, नागरी हक्क, पर्यावरणीय हक्क, लिंग समानता आणि इतर चळवळी यासारख्या विविध क्षेत्रात बदलाच्या विविध चळवळींचे नेतृत्व केले आहे .

आधुनिक काळात नागरी समुदाय अनेक भूमिका पार पडतांना दिसतात . ज्यामध्ये ते मानवी हक्कांचे उल्लंघन आणि प्रशासकीय कमतरतांविरूद्ध

वॉचडॉग प्रमाणे कार्य करतात ,दुर्बल घटकांच्या दृष्टिकोनातून ते वकीलाची भूमिका निभावतात,पीडित नागरिकांच्या हितासाठी आंदोलक बनतात, नागरिकांचे हक्क आणि जबाबदाऱ्यायांचे शिक्षण देण्यासाठी शिक्षक बनतात . अधिकृत प्रयत्नांद्वारे किंवा सरकारी एजंट म्हणून लोकांपर्यंत जाऊन सेवा प्रदाता बनतात. तसेच सत्तांध झालेल्या किंवा आपल्या जबाबदारी पासून विमुक्त झालेल्या राज्यकर्त्यांना कठोरपणे जाब विचारतांनाकिंवा त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देतांनाते पत्रकाराची देखील भूमिका निभावंतांना दिसून येतात. शासकांना विकसित तथा आधुनिक काळातील विकसनशील देशांमध्ये नागरी समुदायांना वरीलपैकी एक किंवा सर्वच भूमिकामध्ये आपण पाहू शकतो .

**समारोप:**

आज एकविसाव्या शतकात स्थानिक, प्रादेशिक तथा जागतिक स्तरावर लोकशाहीची उपयुक्तता सर्वश्रुत आहे. एक कल्याणकारी राज्य हे लोकशाहीमध्ये सहज शक्य आहे. मात्र लोकशाहीच्या काही मर्यादा देखील आहे. या मर्यादेमुळे काही देशात लोकशाही अपयशी ठरली तर उर्वरित अनेक देशांमध्ये ती अस्तित्वासाठी धडपडतांना दिसून येते. ज्या देशांमध्ये एक किंवा अनेक जबाबदार नागरी समुदाय आहेत तिथे मात्र लोकशाही व्यवस्था सुस्थितीत आढळून येते. आज एकविसाव्या शतकात जिथे स्थानिक, प्रादेशीक आणि राष्ट्रीय स्तरावर लोकशाहीपुढे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहे तिथे या नागरी समुदायाची भूमिका आवश्यक आणि महत्वपूर्ण सिद्ध होते.

**संदर्भ:**

1. NeeraChandok (1995). State and Civil Society, *Exploration in Political Theory*, New Delhi, Sage Publication.
2. Elliot C.M. (2006). Civil Society and Democracy: A Reader, Oxford University.
3. Newton, K. (2001). Trust, social capital, civil society, and democracy. *International political science review*, *22*(2), 201-214.

4. Warren, M. E. (2011). Civil society and democracy. In *The Oxford handbook of civil society*.
5. McLaverty, P. (2002). Civil society and democracy. *Contemporary Politics*, *8*(4), 303-318.
6. Baker, G. (1998). Civil society and democracy: the gap between theory and possibility. *Politics*, *18*(2), 81-87.
7. Oates, S., & Gibson, R. K. (2006). The Internet, civil society and democracy. *n OATES, S.; OWEN, D; GIBSON, R.(Eds.). The Internet and politics. citizens, voters and activists. London: Routledge*, 1-16.
8. Carothers, T., &Barndt, W. (1999). Civil society. *Foreign policy*, 18-29.